# कम्युनिकेशन अँड प्लास्टिक आर्ट्स पुस्तकाचे प्रकाशन

सर्जनशील अभिव्यक्तीचे दार खुले करणारा अभ्यास : डॉ. सुभाष पवार

दळणवळण आणि प्लास्टिक आर्टस्चा अभ्यास हा केवळ एक शैक्षणिक प्रयत्न नाही, तर आत्मशोध आणि वैयक्तीक विकासाचा बदल घडवणारा प्रवास आहे. या अभ्यासातून विद्यार्थी सर्जनशीलता मुक्त करण्यासह, द्रकशैलीतील अभिव्यक्ती आणि मानवी संबंध यांच्यातील नव्या शक्यतांचा शोध घेण्यास प्रेरित होतील, असे मत ज्येष्ठ चित्रकार डॉ. सुभाष पवार यांनी व्यक्त केले.

37 व्या अखिल भारतीय लोकमान्य टिळक आणि बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रकला प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच टिळक स्मारक मंदिरात पार पडला. याच कार्यक्रमात डॉ. गीताली टिळक, डॉ. मंजिरी भालेराव, भारत जाधव लिखित 'कम्युनिकेशन अँड प्लास्टिक आर्ट्स' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती व

‘केसरी’चे विश्वस्त संपादक डॉ. दीपक टिळक, कुलगुरू डॉ. गीताली टिळक, ज्येष्ठ चित्रकार शरदचंद्र तरडे, डॉ. मंजिरी भालेराव, भारत जाधव उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, संप्रेषण आणि प्लास्टिक आर्ट्सच्या गतिमान क्षेत्रामध्ये शोध आणि शोधाचा प्रवास सुरू करण्यास उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. या पुस्तकातून विद्यार्थ्यांना कल्पना, भावना, अंतदृष्टी आणि प्रेरणा मिळेल. ही प्रेरणा अभिव्यक्ती आणि मानवी परस्परसंवाद यांच्यातील गहन संबंध स्पष्ट करेल. चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला आणि विविध माध्यमे आणि या सर्व कलांचा इतिहास या पुस्तकांतून विद्यार्थ्यांना सहज कळेल.

प्लास्टिक आर्ट्सच्या क्षेत्रात संवादाला आधार देणारी मूलभूत तत्त्वे आणि पद्धतीचा यात समावेश आहे. या पुस्तकामुळे संवाद कौशल्य, जिज्ञासा व संशोधक वृत्ती वाढीस लागेल. या पुस्तकात प्राचीन गुहेपासून ते मल्टीमीडियापर्यंत तसेच व्हिज्युअल भाषेची उत्क्रांती, मानवी संस्कृतीचा आढावा घेण्यात आला आहे. मास कम्युकेशन, सुसंवादाचा परस्पर संबंध आणि प्लास्टिक आर्टच्या पद्धती या तीन विभागात हे पुस्तक विभागले

आहे. कम्युनिकेशन अँड प्लास्टिक आर्ट्सचा अभ्यास करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वासही डॉ. सुभाष पवार यांनी व्यक्त केला.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक यांनी पुस्तक निर्मितीविषयीची भूमिका स्पष्ट केली, तर डॉ. मंजिरी भालेराव यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली.